# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**कृषी मंत्री** : महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : शुक्रवार, दिनांक ७ मार्च, २०२५ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा.**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा, कळवा परिसरात पाण्याची कृत्रिम टंचाई जाणवत असणे, मुंब्रा येथील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी मंजूर असलेला पाणी कोटा जाणीवपूर्वक कमी करण्यात येणे, येथील नागरिकांना दूषित पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, मुंब्रा, कळवा येथील नागरिकांच्या हक्काचे पाणी मिळत नसल्याने तेथील लोकप्रतिनिधींनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचे दालनात आंदोलन करून वारंवार निषेध केलेला असणे, कळवा येथील विटावा, खारेगाव, भोलानगर व इतर परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असणे, या दोन्ही विभागात महानगरपालिका प्रशासनातील संबंधितांकडून जाणीवपूर्वक कृत्रिम पाणीटंचाई निर्माण केली जात असणे, मुंब्रा, कळवा क्षेत्रातील पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी लोकप्रतिनिधींनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी तसेच वारंवार तक्रारी करूनही आवश्यक उपाययोजना केली जात नसल्याने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, महानगरपालिका प्रशासनाकडून परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यासंदर्भात हेतू:पुरस्सर दुर्लक्ष केले जात असणे, याबाबत शासनाने त्वरित हस्तक्षेप करून करावयाची कार्यवाही व उपायोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री. अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमित झनक, विश्वजित कदम, साजिद पठाण, विकास ठाकरे, संजय मेश्राम, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. बापुसाहेब पठारे, सुनिल राऊत, सुनिल प्रभू, अमित साटम, अजय चौधरी, अनंत (बाळा) नर, मंगेश कुडाळकर, ॲड.पराग अळवणी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई मधील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा लवकरात लवकर पुनर्विकास व्हावा याकरीता म्हाडाकडून ७९ ए या कायद्याची अमंलबजावणी करण्यात येणे, कायद्याच्या अनुषंगाने कन्सेंट झाल्यावर सर्व प्रथम या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी रहिवाश्यांनी विकासकाची नियुक्ती करणे, विकासकाकडून दिलेल्या मुदतीत काम सुरू न झाल्यास रहिवाश्यांनी स्वत: पुढाकार घेत या इमारतीचा पुनर्विकास करणे, परंतु या दोन्ही प्रकीया ठरलेल्या मुदतीत न झाल्यास म्हाडाकडून या पुनर्विकासाचे काम हाती घेण्यात येणे, आतापर्यंत किती इमारतींचा प्रस्ताव म्हाडाकडे आलेला असणे, या ७९ ए नुसार किती इमारतींची नोंद म्हाडाकडे करण्यात आलेली असणे, सद्य:स्थितीत किती विकासकांनी म्हाडाकडे पुनर्विकास प्रस्तावाची नोंद केलेली असणे, आजमितीस अश्या प्रस्तावांची वस्तुस्थिती काय असणे, जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाकडे दुलर्क्ष करीत रहिवाश्यांच्या जीवाशी खेळण्याचा प्रयत्न करणा-या विकासकांवर कोणती कारवाई शासनाकडून करण्यात येणे, याबाबत जुन्या व जीर्ण उपकर प्राप्त इमारतींमध्ये राहणा-या रहिवाश्यांमध्ये असलेले संभ्रमाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील खार (पूर्व) येथे विकासक शिवालीक यांचा पुनर्विकास प्रकल्प गेली १६ वर्ष रखडलेल्या अवस्थेत असणे, पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असलेले २००० कुटूंबीय यामुळे बेघर झालेले असणे, परिणामी त्यांच्यात वाढते भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण, विकासक शिवालीक सदर पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्यास सक्षम नसल्यास याठिकाणी ३ के नियमानुसार कारवाई करून शासनाने प्रकल्प पूर्ण करून घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री.महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शहरी भागांमध्ये मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले जात असणे, सदनिकाधारक हे स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रामाणिकपणे कर भरणा करणारे करदाते असणे, त्यांना पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे देण्याबाबत प्राधान्य देण्याची आवश्यकता असताना अनेक ठिकाणी सोसायटींच्या आवारातच बिअर शॉप व लिकर शॉपला शासनाकडून परवानगी दिली जात असणे, त्यामुळे मद्यपींचा उपद्रव, वादंग, महिलांबाबत छेडछाड

इत्यादींचे प्रमाण वाढणे, लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण असणे, स्थानिक रहिवाशांना नाहक मन:स्ताप होत असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना सोसायटीधारकांच्या तक्रारी येत असणे, यास्तव राज्य शासनाने बिअर शॉप व लिकर शॉप परवाना देताना नियमावलीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असणे, याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री. सुनिल शेळके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मावळ (जि.पुणे) तालुक्यातील इंद्रायणी विद्यामंदिर, तळेगाव दाभाडे या संस्थेस एकूण १५ एकर जागा शासनाकडून देण्यात आली असून त्यापैकी ७ एकर क्षेत्र हे इमारत व ८ एकर क्षेत्र क्रीडांगणास उपलब्ध करून दिलेले असणे. संस्थेने शासन नियमांचा भंग करीत क्रीडांगणासाठी राखीव असलेल्या क्षेत्रामध्ये परवानगी नसतानाही अवैधरित्या बांधकाम सुरु केले असणे, यासंदर्भातील प्राप्त तक्रारींनुसार सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात दिनांक ३ ऑगस्ट २०२३ रोजी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात विषय मांडला असता तत्कालीन मा. महसूलमंत्री महोदयांनी कामातील अनियमिततेच्या स्पष्टतेचा अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी यांना निर्देश देत अहवाल येईपर्यंत बांधकामास स्थगिती देण्याचे आदेश दिलेले असणे, परंतु जिल्हाधिकारी यांच्या अहवालाची कोणतीही शहानिशा न करता महसूल विभागाने या कामाची स्थगिती शिथिल करीत पुन्हा बांधकाम सुरु करण्याचे निर्देश दिलेले असणे. सदर जागा केवळ भाडेतत्वावर दिलेली असतानाही संस्थेने शासनाची जागा तारण ठेवत सुमारे ५ कोटी ८० लाख ९० हजार इतके कर्ज काढल्याची बाब निदर्शनास येणे. सदर महाविद्यालयाच्या सुरू असलेल्या अनियमित व अनधिकृत बांधकामाला स्थगिती देऊन संबंधितांची सखोल चौकशी करण्यात यावी अशी सर्व स्तरावरून वारंवार मागणी होत असणे, परंतु सदर मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेमध्ये शासनाविषयी वाढलेली तीव्र नाराजी, यास्तव महाविद्यालय व्यवस्थापनाविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. सुनिल कांबळे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. विक्रम पाचपुते, भिमराव तापकीर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ससून सर्वोपचार रुग्णालय हे पुणे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचे आरोग्यसेवा केंद्र असून संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र व परिसरातील हजारो रुग्ण येथे उपचारासाठी येत असणे, मात्र या रुग्णालयातील आरोग्य सेवा, पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय व्यवस्थेत अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या असणे, रुग्णालयातील वैद्यकीय उपकरणे, शस्त्रक्रिया साधनसामग्री आणि औषधांचा तुटवडा वारंवार जाणवत असणे, अत्यावश्यक सेवा विशेषतः आपत्कालीन विभाग व सर्जरी विभाग योग्य प्रकारे

कार्यरत नसल्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत असणे, यामुळे गरीब व गरजू रुग्णांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, रुग्णालयातील स्वच्छता व्यवस्थापन अत्यंत असमाधानकारक असणे, वॉर्ड व ओपीडी विभागात स्वच्छतेचा अभाव असून त्यामुळे संसर्गजन्य रोगांचा धोका वाढलेला असणे, तसेच डॉक्टर व परिचारिका यांच्या अपुऱ्या संख्येमुळे रुग्णसेवेत दिरंगाई होत असणे, अनेक वेळा रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसणे, ज्यामुळे गंभीर परिस्थिती उद्‌भवत असणे, रुग्णालय परिसरात रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी आवश्यक सुविधांचा अभाव असणे, शौचालय, पिण्याचे पाणी, विश्रांतीगृह आणि औषध खरेदी केंद्रांची व्यवस्था अपुरी असून रुग्णांच्या नातेवाईकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असणे, यास्तव ससून रुग्णालयातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी आवश्यक वैद्यकीय कर्मचारी भरती, पायाभूत सुविधांचे नूतनीकरण आणि अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्हयातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्या सुरू केल्या असणे, ऑनलाईन हजेरी न लागलेल्या पशु संख्येचे २२ कोटी ५४ लाख २७ हजार २९९ इतके समर्पीत झालेले अनुदान मिळण्याच्यादृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दि.२८.४.२००६ व दि.१०.७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती गठीत करून सुधारीत प्रस्ताव राज्य शासनास जिल्हाधिकारी, सोलापूर, विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर करण्यात येणे, त्यामुळे सांगोला तालुक्यातील १४६ चारा छावण्यांची २१ कोटी ४७ लाख १४ हजार ९२२ रूपये तर मंगळवेढा तालुक्यातील चारा छावण्यांची सुमारे १२ कोटी २० लाख ९६ हजार २५१ रूपये इतक्या अनुदानाची रक्कम प्रलंबित असणे, राज्य शासनाकडून अनुदान तात्काळ वितरीत करण्याबाबत तत्कालीन मा. मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.११ ऑक्टोबर, २०२३ रोजी बैठक घेऊन सदर चारा छावण्यांची कागदपत्रांसह पुनःपडताळणी विभागीय आयुक्त, पुणे यांनी करून अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणे, त्यानुषंगाने शासनाच्या वित्त विभागाने या अहवालास मंजूरी देऊन राज्य कार्यकारिणीची मान्यता घेऊन सदर देयके तात्काळ अदा करण्यात यावी, असा निर्णय मंत्रीमंडळाच्या माहे जुलै, २०२४ मध्ये झालेल्या बैठकीत घेऊनसुद्धा अद्यापही शासनाकडून अनुदानाची रक्कम वितरित न झाल्याने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) सर्वश्री. बबनराव यादव (लोणीकर), प्रकाश सोळंके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या राज्यभरातील विविध शाखांमध्ये अनेक ठेकेदार व खातेदार यांनी अनेक वर्षांपासून एफ.डी. स्वरूपात तसेच बचत खात्यावर सोने तारण तसेच रोख रक्कम ठेवलेली असणे, पतसंस्थेच्या वतीने अधिक व्याज देण्याचे अमिष दाखवणे, व्यापारी, शेतकरी व शेतमजूर यांच्यासह सर्वसामान्य जनतेने मुलीच्या लग्नासाठी अथवा इतर महत्त्वपूर्ण बाबींसाठी रोख रक्कम वा सोने सदरील पतसंस्थेत ठेवणे, मागील वर्षभरापासून या पतसंस्थेचे अध्यक्ष, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी ठेकेदार व खातेदारांचे पैसे वा सोने परत केलेले नसणे, तसेच सदरील ऐवज देण्यास टाळाटाळ करणे, बीड पोलिसांनी या प्रकरणात ठेवीदाराचे पैसे देण्यास कसूर केल्याबाबत गुन्हा नोंदवून ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या अध्यक्षासह इतरांना अटक करणे, त्यामुळे सदरहू ठेवीदार व खातेदार आर्थिक संकटात सापडणे, याबाबत ठेकेदार व खातेदार यांना न्याय मिळवून देणेसंबंधी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (मुख्यमंत्र्यांचे उत्तर)**

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**सात : सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस)**

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) सार्वजनिक आरोग्य विभाग

(३) महिला व बालविकास विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**आठ : शासकीय विधेयक :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री विकास ठाकरे, साजिद खान पठाण, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

नऊ : **(बुधवार, दिनांक ५ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुरेश भोळे, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, सुरेश धस, दिपक केसरकर, अनिल पाटील, प्रशांत बंब, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री नारायण कुचे, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, विजय शिवतारे,**

**धर्मराव आत्राम, प्रकाश भारसाकळे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, चैनसुख संचेती, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रकाश सुर्वे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, किशोर पाटील, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, दौलत दरोडा, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजू तोडसाम, प्रकाश सोळंके, संजय गायकवाड, राजेश वानखडे, संतोष बांगर, संजय बनसोडे, किसन वानखेडे, दिलीप लांडे, सत्यजित देशमुख, विनोद अग्रवाल, चंद्रकांत सोनवणे, दिलीप वळसे-पाटील, संभाजी निलंगेकर-पाटील, संतोष दानवे, राजेश पवार, शिवाजी कर्डिले, सचिन कल्याण-शेट्टी, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, रत्नाकर गुट्टे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री प्रताप अडसड, राणाजगजितसिंह पाटील, बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, किसन कथोरे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, सीमाताई हिरे, देवयानी फरांदे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, संजय केळकर, हरिश पिंपळे, उमेश यावलकर, सुमित वानखेडे, श्रीमती श्रीजया चव्हाण, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, सर्वश्रीमती सई डहाके, स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री योगेश सागर, भिमराव तापकीर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, शंकर जगताप, कृष्णा खोपडे, विक्रम पाचपुते, करण देवतळे, गोपीचंद पडळकर, अमल महाडिक, राहुल आवाडे, महेश लांडगे, चरणसिंग ठाकूर, अमोल जावळे, दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, ॲड. राहुल ढिकले, श्री. सुभाष देशमुख, डॉ. सुरेश खाडे, डॉ. अतुल भोसले, ॲड. राहुल कुल, सर्वश्री काशिराम पावरा, समीर मेघे, समीर कुणावार, विजय रहांगडाले, किर्तीकुमार भांगडिया, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री विनोद अग्रवाल, संजय पुराम, किशोर जोरगेवार, राजेश बकाने, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री श्याम खोडे, केवलराम काळे, भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, सिध्दार्थ शिरोळे, अनुपभैय्या अग्रवाल, राजेश पाडवी, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शिवाजी पाटील, संजय उपाध्याय, चंद्रकांत पाटील, सुनिल शेळके, निलेश राणे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री शरद सोनवणे, किरण सामंत, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, राजेश विटेकर, राजू कारेमोरे, शेखर निकम, सचिन पाटील, संग्राम जगताप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेऊन राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेऊन आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा

उतारे यासारख्या योजना राबऊन पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)" प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळऊन देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतक-यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतकऱ्यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतक-यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरीता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर

हे जिरायती शेतक-यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मंजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सूत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणे, ‘नारीशक्ती दुत ॲप’ हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजू महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघूर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर,

महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दहा : **सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, दिलीप सोपल, अमीन पटेल, रोहित पवार, अजय चौधरी, अमित देशमुख, उत्तमराव जानकर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, संदिप क्षिरसागर, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री बापूसाहेब पठारे, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, राजू खरे, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मंगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"जुलै, २०२४ मध्ये राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना लागू करणे, सदर योजनेमध्ये तब्बल २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींची नोंदणी करणे व त्यांना रु. १५००/- दरमहा अनुदान देण्यास सुरुवात करणे, योजनेच्या निकषांचे उल्लंघन करुन गैरफायदा घेतलेल्या लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये सुरु करणे, अनेक बहिणींनी स्वतःहून अर्ज मागे घेणे व लाखों बहिणींचे अर्ज छाननीमध्ये बाद करण्यात येणे, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणपतीच्या मूर्तींवर असलेली बंदी, सदर बंदीमुळे माघी गणेश जयंतीच्या मूर्तींच्या विसर्जनाची झालेली कोंडी, अद्यापही माघी गणपतींच्या मूर्तींचे विसर्जन न झाल्यामुळे भाद्रपद महिन्यातील गणेश मूर्तींच्या (पीओपी) विसर्जनाच्या आखलेल्या उपाययोजनांवर प्रश्न निर्माण होणे, पीओपी व्यतिरिक्त अन्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे गणेश भक्त व मूर्तीकार यांच्यामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, मुंबई महानगर प्रदेशातील रस्ते वाहतूक, मेट्रो रेल्वे या सार्वजनिक वाहतूक सेवा अपुऱ्या असल्यामुळे 'केबल कार' वाहतूक सेवा सुरु करण्यासाठी आराखडा तयार करणे, राज्यातील धार्मिक स्थळांना जोडण्यासाठी शक्तीपीठ मार्ग शासनाने आखणे, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरावस्था, पावसाळयापूर्वी सदर रस्ते वाहतूकीसाठी योग्य करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक तरुण बेरोजगार असणे, त्यांना रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, राज्यातील द्राक्ष बागायतदारांचे कमी भावामुळे झालेले नुकसान, महाशिवरात्री हा दिवस द्राक्ष दिन म्हणून साजरा

करून राज्यातील शेतकऱ्यांना हातभार लावण्याची आवश्यकता, राज्यात राजरोसपणे डान्सबार मोठ्या प्रमाणावर सुरु असणे, पोलिसांचे डान्सबारवर बंदी आणण्यास जाणीवपुर्वक होत असलेले दुर्लक्ष, राज्यात मागेल त्याला सौर पंप योजनेतील जाचक अटींमुळे अनेक शेतकरी सदर योजनेपासून वंचित असणे, राज्यात विविध समाजांसाठी १८ महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतु त्यांना निधी न दिल्यामुळे त्यांची कामे प्रत्यक्षात सुरु न होणे, सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या बाबत गंभीर नसल्याचे निदर्शनास आले असून निवडणूकीपुर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीची घोषणा करुनही अद्याप कर्जमाफीबाबत कोणताही निर्णय घेतलेला नसणे, तसेच विदर्भातील धान, सोयाबीन, कापूस इत्यादी पिकांना बाजारभाव मिळत नसणे, इतर पिकांना हमीभाव मिळण्याची गरज असणे, तसेच राज्यातील अनेक रस्त्यांची विकासाच्या नावाखाली अत्यंत दुरावस्था झाली असल्याने या रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाणात वाढ झालेली असणे, रस्ते अपघातांमुळे मागील काही महिन्यांपासून अनेक बळी जाणे व अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे वाहनातून प्रवास करणाऱ्या वाहतुकदारांना जीव मुठीत ठेवून प्रवास करावा लागत असणे या सर्व बाबींमुळे राज्यातील शेतकरी, महिला वर्ग व सर्वसामान्य जनतेत असंतोष पसरला असून याबाबत राज्य शासनाने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) मुंबईसह ठाणे, नवी मुंबई आणि सोलापूर, नाशिक जिल्ह्यात विशेष मोहीम राबवून ४३ बांगलादेशी घुसखोरांना अटक केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, तसेच अवघ्या पाचशे ते दोन हजार रुपयात भारतीय ओळखपत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे बनवत असल्याचेही निदर्शनास येणे, त्यामध्ये अटक केल्यानंतर त्यांना मायदेशी पाठवण्याच्या प्रक्रियेला अनेक वर्षे लागत असणे, त्यामुळे बांगलादेशी घुसखोरांच्या प्रवेशावर संपूर्ण आळा घालण्यासाठी ठोस कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे घुसखोरीला आळा घालण्यासाठी राज्यात विशेष यंत्रणा तैनात करण्याबाबत तसेच अटक केलेल्या बांगलादेशींना लवकरात लवकर मायदेशी पाठवण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"गुहागर (जि. रत्नागिरी) येथील खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील प्रथम वर्षाचा प्रवेश, त्यांची हजेरी, त्यांच्या परीक्षा सारे काही बोगस दाखऊन त्यांना मुंबई विद्यापीठाकडून थेट तिसऱ्या वर्षाचे पदवी प्रमाणपत्र दिले जात असल्याचे आणि यातून करोडो रूपयांचा गैरव्यवहार सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या दरम्यान निदर्शनास येणे, महाविद्यालयात चालणारी अशा प्रकारची बेकायदेशीर व नियमबाह्य कामे करण्यास नकार दिला म्हणून दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी संस्था चालकांनी ३ प्राध्यापकांना मारहाण करणे, त्यात तिघेही गंभीर जखमी होणे, कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करून सदर महाविद्यालयातून आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना अशाप्रकारे थेट पदवी प्रमाणपत्र देण्यात आल्याची बाब समोर आलेली असणे, सदर प्रकार उघडकीस आल्यानंतर संस्था चालकांना वाचविण्याचे धक्कादायक प्रयत्न सुरु असणे, या घोटाळ्यामध्ये मुंबई विद्यापीठाच्या काही अधिकारी व कर्मचारी यांचाही सहभाग असण्याची शक्यता असून या प्रकरणाचा उलगडा करुन दोषींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक ३ ते ५)**

**(३) श्री.अमित देशमुख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"वलांडी प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ३० ते ३५ गावांतील नागरिक उपचारासाठी येत असणे, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांपैकी दोन पदे, परिचर आणि सफाई कर्मचाऱ्यांची पदेही रिक्त असणे, वलांडी ग्रामपंचायतीने एक वर्षापूर्वी ग्रामीण रुग्णालय मंजुरीसाठी नव्याने प्रस्ताव पाठविणे, जिल्हा नियोजन समिती आणि जिल्हा परिषदेनेही मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला असणे, शवविच्छेदन खोलीत विद्युत पुरवठ्याची सोय नसल्याने गैरसोय होत असणे, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील नागरिकांना उपचारासाठी लांबचा प्रवास करावा लागत असणे, तसेच लातूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीचे सरकारने धोरण आखणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. प्रविण दटके, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नागपूर शहरात १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधण्यासाठी एन. एस. कन्स्ट्रक्शन कंपनीला दिनांक २ मे, २०१८ रोजी कार्यादेश दिलेला असणे, सदर काम माहे मे २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्यापही जिल्हा रुग्णालय प्रकल्पाचे काम, आरोग्य सुविधा आणि आवश्यक सामग्री पूर्ण करण्यास विलंब होत असल्याबाबत मा. उच्च न्यायालयाने शासनाला विचारणा केलेली असणे, रुग्णालयात ओपीडी, नेत्ररोग, प्रयोगशाळा, फिजिओथेरपी, स्त्रीरोग, सोनोग्राफी आदी वैद्यकीय सुविधांकरिता आवश्यक पदांना मंजुरी घेण्याबाबत उच्चस्तरीय समितीला सादर केलेल्या प्रस्तावावर अद्याप निर्णय झालेला नसणे, नागपूर शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने रुग्णालयाचे बांधकाम आणि पदे मंजूर करून रुग्णालय तत्काळ कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर आणि गडचिरोली या दोन जिल्ह्यासाठी गडचिरोली येथे स्थापन करण्यात आलेल्या गोंडवाना विद्यापीठाचे उपकेंद्र चंद्रपूर येथे स्थापन करण्याची विद्यार्थ्यांची मागणी प्रलंबित आहे. चंद्रपूर येथे विद्यापीठाचे उपकेंद्र झाल्यास ते सर्वार्थाने सोयीचे ठरणार असल्यामुळे याबाबत त्वरित कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठाशी संबंधित कामकाजासाठी प्रत्येक कामासाठी विद्यार्थीवर्गाला गडचिरोली येथे जावे लागते. चंद्रपूर ते गडचिरोली हे अंतर दोन ते अडीच तास असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो, त्यामुळे चंद्रपूर येथे उपकेंद्र होण्याची नितांत आवश्यकता आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ५ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा